अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर
स्टोअर विभाग जा.क्र. - 85
दिनांक. 11 /06/2026

## अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर
### ई-लिलाव क्र.01 दिनांक. 11 /06/2026

**अहिल्यानगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील जुने निरुपयोगी लोखंडी कंटेनरची ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात येत असून विक्री करण्यात येणा-या जुने निरुपयोगी कंटेनरचा तपशिल खालील प्रमाणे –**

| Sr. No | Envelopes | Start Date | Time |
|---|---|---|---|
| 1 | Auction Publieshed Date | 11 /06/2026 | 18.15 |
| 2 | Document Submissition Start Date | 11 /06/2026 | 18.15 |
| 3 | Document Submisstion End Date | 18/06/2026 | 15.00 |
| 4 | Document Approval Start Date | 18 /06/2026 | 15.00 |
| 5 | Document Approval End Date | 24/06/2026 | 18.15 |
| 6 | Live Auction Start Date | 25/06/2026 | 11.00 |
| 7 | Live Auction End Date | 25/06/2026 | 13.00 |

| अ.क्र. | ई-लिलावाचे वर्णन | लिलाव पत्रकाची किंमत | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | अहिल्यानगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील अंदाजे 45-50 जुने निरुपयोगी लोखंडी कंटेनर विक्री<br>एका कंटेनरचे अंदाजे वजन 500 ते 700 किलो | रू.3,000/- | रू.15,000/- |

1) लिलाव प्रक्रिया करताना सध्या फक्त प्रती 1 किलो करिता दर मागविण्यात येत असून एका किलो करिता किमान मुल्य (Upset Price) रक्कम रुपये.30=00 / प्रती 1 किलो याप्रमाणे ठरवण्यात आलेली आहे.लिलाव प्रक्रिया पार पडल्यानंतर सदरचे लोखंडी कंटेनर हे यशस्वी लिलाव धारकास स्वखर्चाने जागेवर वजन करुन वजनाप्रमाणे होणारी प्रत्यक्ष रक्कम मनपा कार्यालयाकडे जमा करुन स्वखर्चाने घेवून जावे लागतील.

2) याप्रमाणे लिलाव पत्रकाची किंमत रूपये 3,000/- (अक्षरी रूपये.तीन हजार फक्त) व बयाणा रक्कम रूपये.15,,000/- (अक्षरी रूपये.पंधरा हजार फक्त) या प्रमाणे दोन स्वतंत्र धनाकर्ष (DD) मा आयुक्त,अहिल्यानगर महानगरपालिका या नावाने तयार करून स्टोअर विभाग,अहिल्यानगर

महानगरपालिका कार्यालयात कार्यालयीन वेळेत जमा करावे लागतील. सदर रक्कमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही. लिलाव पत्रकाची किंमत रु.3,000/- अक्षरी (तीन हजार रुपये फक्त) कोणत्याही परिस्थितीत परत केली जाणार नाही.

3)निविदाधारकास यशस्वी निविदा स्विकृतीनंतर रक्कम रुपये.67,500=00फक्त इतक्या रक्कमेचा धनाकर्ष (DD) 3 तीन दिवसात मा आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका या नावाने सुरक्षा ठेव म्हणून जमा करावा लागेल. सदर रक्कमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही.

4) प्रत्येक निविदाधारकाने दिलेल्या संकेतस्थळावर निविदे सोबत मागविलेली सर्व कागदपत्रे अपलोड करावीत तसेच भरलेली निविदा ऑनलाईन सादर करावी

5)निविदेमध्ये किंवा परिशिष्टामध्ये केलेले बदल ग्राहय धरले जाणार नाहीत.

6)निविदा पत्रकाची किंमत कोणत्याही परिस्थितीत परत केली जाणार नाही.

<u>तांत्रिक कागदपत्रें -</u>

1) आधार कार्ड
2) पॅन कार्ड
3) GST नोंदणी प्रमाणपत्र
4) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
5) लिलाव पत्रकाची किंमत व बयाना (EMD) रक्कमेबाबत काढलेल्या धनाकर्षाची छायांकित प्रत
6) काळया यादीत नाव नसले बाबत प्रतिज्ञापत्र रु.500/- स्टँम्पपेपरवर (ANNEXURE II)
7) निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे शपथपत्र रु.500/- स्टँम्पपेपरवर (खाली दिलेल्या नमुन्यानुसार)
8) निविदाकाराचे मनपा पदाधिकारी,अधिकारी व कर्मचारी यांचेशी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (खाली दिलेल्या नमुन्यानुसार)
9) निविदेसोबत जोडलेली (अपलोड केलेली) सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे सत्य प्रतिज्ञापत्र (रु.500/- च्या स्टॅम्प पेपरवर) (खाली दिलेल्या नमुन्यानुसार)

वरील नमूद सर्व कागदपत्र ऑनलाईन पध्दतीने भरावीत. सर्व कागदपत्र उपलब्ध असल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल.

<u>लिलावा संदर्भातील अटी व शर्ती :-</u>

1.ई-लिलावात भाग घेण्यासाठी www.eauction.gov.in या संकेतस्थळावर संगणकीय नोंदणी करून लिलाव शुल्क व बयाना (EMD) रक्कमेबाबत काढलेल्या धनाकर्षाची छायांकित प्रत, अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु. 500/- बॉन्डवर शपथपत्र, बँकेचा तपशील स्कॅन करून ई-लिलावासोबत (तांत्रिक लिफाफा) सादर करावा...

2. निव्वळ जास्त दराची निविदा स्वीकारली जाईलच असे नाही. कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारणे अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका यांनी स्वतः कडे राखून ठेवला आहे. त्यासंबंधी कोणतीही चर्चा केली जाणार नाही अथवा स्पष्टीकरण दिले जाणार नाही. निवेदेच्या अटी व शर्ती यामध्ये बदल करण्याबाबत तसेच निविदेसंदर्भात काही वाद निर्माण झाल्यास मा आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील. तो सर्व निविदाधारकाना बंधनकारक राहील.

3. निविदा मंजूर केल्याचे आदेश काढल्यानंतर यशस्वी निविदाधारकास / ठेकेदाराला निविदेत नमूद केलेली सुरक्षा ठेव तीन दिवसाच्या आत भरावी लागेल. सदर रक्कम स्टोअर विभाग, अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या कार्यालयात जमा करावी लागेल. जर विहित मुदतीत ठेकेदाराने रक्कम भरली नाही तर बयाना रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच निविदाकाराच्या नावाची काळ्या यादीमध्ये नोंद घेण्यात येईल.

4. जे कंत्राटदार/निविदाकार निविदा स्वीकृतीनंतरही कंत्राट पार पाडण्यास असमर्थता दर्शवतील,त्यांनी भरलेली बयाना रक्कम जप्त करण्यात येईल.

5. निविदाकाराने सदर साहित्य उचलणे पूर्वी संपूर्ण रक्कम महानगरपालिकेकडे भरणे क्रमप्राप्त राहिल. साहित्य उचलने बाबतचा आदेश प्राप्त झाल्यानंतर 7 दिवसाच्या आत स्वखर्चाने सर्व साहित्य घेऊन जाणे क्रमप्राप्त आहे. सदर अटीचे उल्लंघन केल्यास दैंनदिन रू.2000/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल व सदर दंडाची रक्कम सुरक्षा ठेवींतून वसूल करण्यात येईल. आदेश प्राप्त झालेनंतर सर्व साहित्याची जबाबदारी ही निविदाधारकाची असेल त्यास महानगरपालिका कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

6. पात्र निविदाधारकास कायद्याप्रमाणे लागू होणारे सर्व कर स्वतः भरण्याची जबाबदारी स्विकारावी लागेल ही बाब मान्य असल्यावरच ई-लिलावात भाग घेता येईल.

7. कोणत्याही बोली धारकाची बोली स्वीकारणे अथवा नाकारण्याबाबतचे सर्व अधिकार आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

8. साहित्य भरताना नेताना सदर साहित्या व्यतीरिक्त इतर कुठल्याही साहित्याची अथवा इमारतीची तुटफुट होणार नाही याची जबाबदारी निविदाधारकाची राहिल.

9. ई-लिलावासाठी किमान बोली ही साहित्याच्या किमान मूल्य (Upset Price) पेक्षा अधिक रकमेची लावावी लागेल व प्रत्येक बोली रु.1/- व त्याच्या पटीत बोलावी लागेल.

10. ज्या बोलीदाराची बोली स्वीकारण्यात येणार नाही त्यांच्या अनामत रकमा ई-लिलाव संपल्यानंतर विहीत कार्यालयीन कार्यवाही करून RTGS, NEFT द्वारे संबंधीताच्या खात्यात जमा करण्यात येतील त्यासाठी संबंधीत ई-लिलाव धारक यांनी ई-लिलाबासोबत बँक खात्यासंदर्भात (बैंक, शाखा, खाते क्रमांक, IFS CODE, ओळखपत्र, अधिकार पत्र) तपशील स्वतःच्या लेटर पॅडवर स्वाक्षरीनिशी देण्यात यावा.

11. टेक्नीकल बीड ओपनिंग नंतर ज्या व्यक्तीची कागदपत्रे परिपूर्ण असतील तेच लिलावधारक पुढील ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी होऊ शकतील.

अधिक माहितीसाठी स्टोअर विभाग प्रमुख,स्टोअर विभाग,अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**सोबत:** 1)Annexure I
2) Annexure II
3)शपथपत्र नमुना
4) हमीपत्र नमुना
5)प्रतिज्ञापत्राचा नमुना

दिनांक :

उपायुक्त (कर)
अहिल्यानगर महानगरपालिका

प्रत - मा.महापौर,अहिल्यानगर महानगरपालिका,
प्रत - मा.उपमहापौर,अहिल्यानगर महानगरपालिका,
प्रत - मा.आयुक्त,अहिल्यानगर महानगरपालिका,
प्रत - मा.सभापती - स्थायी समिती,अहिल्यानगर महानगरपालिका,
प्रत - मा.सभापती - महिला व बालकल्याण समिती,अहिल्यानगर महानगरपालिका,
प्रत - मा.उपसभापती - महिला व बालकल्याण समिती,अहिल्यानगर महानगरपालिका,
प्रत - मा.अतिरिक्त आयुक्त,अहिल्यानगर महानगरपालिका,
प्रत - मा.उपायुक्त (सा.),अहिल्यानगर महानगरपालिका,
प्रत - मा.उपायुक्त (कर),अहिल्यानगर महानगरपालिका,
- यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

प्रत - संगणक विभाग प्रमुख,अहिल्यानगर महानगरपालिका यांस सदरची ई-ऑक्शन नोटीस महानगरपालिका वेबसाईट वर प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करावी.

प्रत - ई-निविदा कक्ष प्रमुख,अहिल्यानगर महानगरपालिका यांस सदरची ई-ऑक्शन नोटीस www.eauction.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करावी.

प्रत - हवलदार,अहिल्यानगर महानगरपालिका यांस सदरची ई-ऑक्शन नोटीस महानगरपालिका नोटीस बोर्डवर डकवून प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करावी.